जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -७६ दिनांक -२९/०१/२०२४**

## गुन्हे शाखे अंतर्गत मकोका कारवाई

## टोळी प्रमुख विठठल महादेव शेलार व त्याचे इतर १६ साथीदार यांचेविरूध्द मकोका कारवाई

दि. ०५/०१/२०२४ रोजी दुपारी १३/२० वा. चे सुमारास इसम नामे शरद मोहोळ हे स्वतःच्या लग्नाचा वाढदिवस असल्याने ते त्यांच्या सहका-यांसह त्यांचे स्वतःचे ओम साई केबल ऑफिस,सुतारदरा कोथरूड येथुन पायी जात असताना येवले चाळी जवळ पांडुरंग मंदिराशेजारी, सुतारदरा कोथरूड पुणे येथील सार्वजनिक रस्त्यावर आरोपी मुन्ना ऊर्फ साहील पोळेकर रा. शिवशक्ती नगर, पडवळ बिल्डींग समोर, सुतारदरा, कोथरुड, पुणे व त्याचे इतर दोन अनोळखी साथीदार यांनी शरद मोहोळ यांचेवर पिस्तूलने फायरिंग करून त्यांना गोळया घालून जिवे ठार मारले आहे. तसेच फायरिंग करून आरोपी पळुन जात असताना त्यांचा पाठलाग करणारे प्रमोद साठे यांचेवर देखील आरोपी मुन्ना पोळेकर याने फायरिंग करुन त्याला जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरून **कोथरूड पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ०२/२०२४,भा.दं.वि.कलम ३०२,३०७,१२०(ब),२०१,३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,७,२५,२७ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयाच्या तपासा दरम्यान आरोपी नामे **१)साहील ऊर्फ मुन्ना संतोष पोळेकर,वय २० वर्षे रा.गल्ली नं.२७/७,शिवशक्ती मित्रमंडळ शेजारी सुतारदरा,कोथरुडपुणे २)नामदेव महिपती कानगुडे,वय ३४ वर्षे,रा.शिवशक्तीनगर,सुतारदरा,कोथरुड,पुणे ३)विठ्ठल किसन गांडले,वय २० वर्षे,रा.स.नं.११२, शिवशक्तीनगर,सुतारदरा,कोथरुड,पुणे ४)अमित मारुती कानगुडे,वय २४ वर्षे रा.लेन नं.९५,स्वराज मित्र मंडळ पर्वती,पुणे ५)चंद्रकांत शाहु शेळके,वय-२२ वर्षे,रा.लेन नं.९४,जनता वसाहत,पर्वती,पुणे ६)विनायक संतोष गव्हाणकर,वय २० वर्षे,रा.शंतनू कॉम्प्लेक्स,पौड रोड,मुळशी,जि.पुणे ७)रविंद्र वसंतराव पवार,वय ४० वर्षे,रा.स.नं.३४,नांदे गाव,दत्ता राजे बंगला,ता.मुळशी,जि.पुणे ८)संजय रामभाऊ उढाण,वय ४३ वर्षे, रा.प्लॉट नंबर ८,संकल्प पारीजात,लेन नंबर ८,उजवी भुसारी,कोथरूड,पुणे ९)सतीश संजय शेडगे,वय २८ वर्षे,रा.स्वप्नशिल्प अपार्ट.माथवाडी फाटा,भुगाव,ता.मुळशी,जि.पुणे १०)धनु उर्फ धनंजय मारूती वाटकर,वय २५ वर्षे,रा.फिनीक्स स्काय बिल्डिंग,ओम कॉलनी,विदयानगर,सैदापुर कराड,ता.कराड, जि.सातारा ११)नितीन अनंता खैरे,वय ३४ वर्षे,रा.सर्वे नं.८१/०६,नंदनवन सोसायटी,गादिया इस्टेट,**

**कोथरूड,पुणे १२)आदित्य विजय गोळे,वय २४ वर्षे,रा.संत तुकाराम नगर,गोळे आळी,पिरंगुट,ता.मुळशी जि.पुणे १३)संतोष दामोदर कुरपे,वय-४९ वर्षे,रा.रघुनंदन सोसायटी,कृष्णा कॉलनी परमहंस नगर, कोथरूड,पुणे १४)रामदास उर्फ वाघ्या नानासाहेब मारणे,वय ३६ वर्षे,रा.मु.आंबेगाव,पो.उरवडे,ता. मुळशी,जि.पुणे १५)विठठल महादेव शेलार,वय-३६ वर्षे,रा.मु.बोथरवाडी,पो.उरवडे,ता.मुळशी,जि.पुणे (टोळी प्रमुख) व पाहिजे आरोपी १६)प्रितसिंग,रा.उमरठी,राज्य मध्य प्रदेश १७)गणेश मारणे,रा.कर्वेनगर, पुणे यातील अ.क्र.१ ते १५ यांना अटक करण्यात आली असुन,आरोपी क्र.१६ व १७ हे पाहिजे आरोपी आहेत.**

सदर नमुद पाहिजे आरोपी **विठठल महादेव शेलार (टोळी प्रमुख)** याने संघटीतपणे स्वतःच्या व टोळी सदस्य यांच्या आर्थिक फायदयासाठी वेगवेगळया सदस्याच्या टोळया चालवुन बेकायदेशीर मार्गाने आर्थिक लाभ घेत असुन त्याचे विरुद्ध गंभीर स्वरुपाचे २१ गुन्हे दाखल आहेत. त्याचेवर प्रतिबंधक कारवाई करून सुद्धा त्याने पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटीतपणे दहशतीच्या मार्गाने स्वतःचे व टोळीचे वर्चस्व निर्माण करण्याचे हेतुने व इतर फायद्यासाठी सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने प्रस्तुत गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन-१९९९ चे कलम ३(१)(i),३(२),३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करणेकामी मा.सहायक पोलीस आयुक्त,गुन्हे-१,पुणे शहर,श्री.सुनिल तांबे यांनी मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.अमोल झेंडे यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.रामनाथ पोकळे यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करून कोथरूड पोलीस स्टेशन गु.रजि.नं.०२/२०२४,भा.दं.वि.कलम ३०२, ३०७,१२० (ब),२०१,३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,७,२५,२७ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)१३५ या गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन-१९९९ चे कलम ३(१)(i), ३(२),३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर श्री.रामनाथ पोकळे यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस आयुक्त,गुन्हे-१,पुणे शहर,श्री.सुनिल तांबे हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,(अतिरिक्त कार्यभार) व मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर,श्री.अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त,गुन्हे-१,पुणे शहर,श्री. सुनिल तांबे यांचे मागदर्शनाखाली गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड, सपोनि.श्री. विवेक पाडवी, पोलीस उप निरीक्षक,श्री.राहुल पवार, पोलीस अंमलदार, सुनिल राऊत, शरद वाकसे, नितीन कांबळे, नितिन काळे, गणेश ढगे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरीराविरुद्ध व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवुन, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देणेबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मागदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ११४ कारवाई आहे.**